**पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, मर्यादित, पुणे यांचा सन २०२४-२५ चा ५४ वा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-**

- पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, मर्यादित, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे तयार करुन तो दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी संचालक मंडळाकडून स्विकृत करण्यात आला.

- सदर वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेल्या सांविधिक लेखा परिक्षक यांच्याकडून दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी परिक्षित करुन घेण्यात आले.

- पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, मर्यादित, पुणे यांच्या दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२४-२०२५ च्या वार्षिक अहवाल, वार्षिक लेख्यास व त्यावरील भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायांस मान्यता दिलेली आहे.

- त्यानंतर दिनांक ०७ एप्रिल, २०२६ रोजी सदर वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल (इंग्रजी व मराठी) छपाईसाठी पाठविण्यात आला. छपाई करुन महामंडळास दिनांक १६ जून, २०२६ रोजी लेखे प्राप्त झाले.

- कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ३९५/१(ब) मधील तरतूदीनुसार पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचा सन २०२४-२०२५ चा ५४ वा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्याकरीता दिनांक १९ जून, २०२६ रोजी शासनास सादर करण्यात आलेले आहेत.

त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(अजित सासुलकर)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

एच २५६-७